क्र. कामगार /ब/ककनिस/९०-९१/ ३७७७६
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ
प्रकाशगड, वांद्रा [पूर्व] मुंबई-५१
दिनांक :- ३१/१०/१९९१.

# प रि प त्र क

विषय :- कर्मचारी कल्याण निधी

कर्मचा-यांच्या पाल्यांना देण्यात येणा-या रोख पारितोषिके/शिष्यवृत्तीसंबंधी.

कर्मचारी कल्याण निधी समितीची २४ वी बैठक दि. ८-१०-९१ रोजी मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१] एखादा कर्मचा-याचा मुलगा/मुलगी १० वी च्या परिक्षेत बसून परीक्षेचा निर्णय जाहिर होण्यापुर्वी जर सदर कर्मचारी मयत झाला आणि परिक्षेच्या निर्णयानुसार सदर मुलगा/मुलगी कल्याण निधिच्या नियमानुसार शिष्यवृत्तीस पात्र असेल तर त्या मुलाला/मुलीला २४ महिन्याच्या शिष्यवृत्ती इतकी एकरकमी रक्कम मंजूर करता येईल व सदर रक्कम मुलाच्या/मुलीच्या पालकास [ Guardian ] देण्यात यावी. मात्र सदर मुलाने/मुलीने पुढील शैक्षणिक सत्रासाठी महाविद्यालयामध्ये नाव घातले असले पाहिजे. हा निर्णय १९९०-९१ या शैक्षणिक वर्षापासून अमलात येईल.

२] मार्च १९९१ किंवा त्यानंतर माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण होणा-या पाल्यांना देण्यात येणा-या बक्षिसे व शिष्यवृत्यांच्या रकमेत वाढ करून त्यांना पुढीलप्रमाणे सुधारित दराने बक्षिसे व शिष्यवृत्या देण्यात येतील.

अ] माध्यमिक शालांत परिक्षेत उत्तीर्ण होणा-या कर्मचा-यांच्या पाल्यांना गुणवत्तेनुसार देण्यात येणारी पहिली सहा बक्षिसे

१] पहिले बक्षिस ........ रु. २५०/-
२] दुसरे बक्षिस ........ रु. २००/-
३] तिसरे बक्षिस ........ रु. १५०/-
४] चवथे बक्षिस ........ रु. १२५/-
५] पाचवे बक्षिस ........ रु. १००/-
६] सहावे बक्षिस ........ रु. ७०/-

..२..

ब] मार्च १९९१ किंवा त्यानंतरच्या माध्यमिक शालांत परिक्षेत उत्तीर्ण झा राखीव वर्गातील कर्मचा-यांच्या पाल्यांना देण्यात येणारी ४ बक्षिसे प्रत्ये २५०/- प्रमाणे देण्यात येतील. राखीव वर्गातून एखाद्या समाजगटातून बर् अर्ज प्राप्त न झाल्यास त्याऐवजी त्याच वर्गातून गुणवत्तेनुसार इतर सम कर्मचा-यांच्या पाल्याला रु. १००/- चे बक्षिस देण्यात यावे.

क] सध्याच्या नियमाप्रमाणे पात्र असलेल्या वेतनगट ३ व ४ मधील कर्म पाल्यांना रु.७५/- दरमहा शिष्यवृत्ती देण्यात यावी. कर्मचा-यांच्या मुलीना यापूर्वी शिष्यवृत्ती मंजूर झाली आहे आणि शिष्यवृत्ती पुढे या पात्र आहेत त्यांना सुध्दा सुधारीत दराने शिष्यवृत्ती ९१-९२ या शैक्षणि सत्रापासून देय राहील.

मुख्य कार्यालयातील सर्व विभागीय अधिकारी तसेच सर्व क्षेत्रिय व क विभागातील अधिका-यांना विनंती करण्यात येते की त्यांनी कर्मचारी क निधी समितीचे वरील निर्णय सर्व कर्मचा-यांच्या नजरेस आणून द्यावेत.

सचिव
कर्मचारी कल्याण निधी समिती/
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

प्रत रवाना
प्रेषण यादीनुसार सर्वांना

मातल/३०१०९१.